असा. क्र. ७६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२० ४११

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर २९, १९९७/पौष ८, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.—अनुसूचित क्षेत्रांतील पंचायतींना स्वयंशासन करण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करण्यासाठी राज्याच्या विवक्षित कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. | ७२४–७३३ |

दिनांक २८ डिसेंबर, १९९७ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९ डिसेंबर, १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**अनुसूचित क्षेत्रांतील पंचायतींना स्वयंशासन करण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करण्यासाठी राज्याच्या विवक्षित कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** अनुसूचित क्षेत्रांतील पंचायतींना स्वयंशासन करण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी राज्याच्या विवक्षित कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट

आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांतील पंचायतींना स्वयंशासन करण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करणे (राज्याच्या विवक्षित कायद्यांमध्ये सुधारणा) अधिनियम, १९९७ असे म्हणावे.

## प्रकरण दोन

### मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ ची सुधारणा.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यात कलम ८अ समाविष्ट करणे. २. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (या प्रकरणात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश केला आहे) याच्या कलम ८ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५९ चा मुंबई ३.

अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्ये. "(८अ). अनुसूचित क्षेत्रातील प्रत्येक ग्रामसभा पुढील गोष्टी करण्यास सक्षम असेल,—

(एक) जनजातींच्या परंपरा आणि रूढी, त्यांची सांस्कृतिक वैशिष्ट्ये, सामूहिक साधनसामग्री आणि विवादाचा निर्णय करण्याची रूढ पद्धती यांचे संरक्षण व जतन करणे;

(दोन) सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी योजना, कार्यक्रम आणि प्रकल्प पंचायतीमार्फत कार्यान्वयनासाठी हाती घेण्यापूर्वी, पंचायतीमार्फत कार्यान्वित होणाऱ्या अशा योजना, कार्यक्रम आणि प्रकल्प यांना मान्यता देणे;

(तीन) खंड (दोन) मध्ये निर्देश केलेल्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्यासाठी त्या पंचायतीने करावयाच्या निधीच्या विनियोगासंबंधीचे प्रमाणपत्र पंचायतीला देणे;

(चार) दारिद्र्य निर्मूलन आणि तत्सम इतर कार्यक्रम किंवा योजनांखालील लाभधारक व्यक्ती ठरवणे व त्यांची निवड करणे;

(पाच) मादक द्रव्यांची विक्री आणि वापर यांच्यावर संबंधित पंचायतीमार्फत बंदी अंमलात आणणे किंवा त्या गोष्टी विनियमित किंवा निर्बंधित करणे;

(सहा) महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांतील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण, व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ याच्या तरतुदींच्या अधीन राहून, गौण वनोत्पादनाचे समुपयोजन आणि त्याच्या व्यापाराचे नियमन यासंबंधी पंचायतीला निदेश देणे; १९९७ चा महा. ४५.

(सात) अनुसूचित क्षेत्रांतील जमिनीचे हस्तांतरण किंवा अन्यसंक्रामण थांबवण्याच्या दृष्टीने, संबंधित पंचायतीमार्फत शिफारशी करणे आणि अनुसूचित जनजातींच्या कोणत्याही व्यक्तीची जमीन बेकायदेशीरपणे हस्तांतरित किंवा अन्यसंक्रामित झाल्यास, ती तिला परत करण्यासाठी पंचायतीमार्फत समुचित कृती करणे;

(आठ) अनुसूचीत जनजातींना पैसे कर्जाऊ देण्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने संबंधित पंचायतीमार्फत शिफारस करणे ;

(नऊ) स्थानिक योजना आणि अशा योजनांसाठी साधन सामुग्री, तसेच जनजाति उप-योजना यांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने, संबंधित पंचायतीमार्फत शिफारशी करणे.".

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ४५ अ समाविष्ट करणे.

"४५अ. अनुसूचित क्षेत्रांतील प्रत्येक पंचायत,— अनुसूचित क्षेत्रांतील पंचायतीचे अधिकार व कर्तव्ये.

(एक) कलम ८अ, खंड (दोन) अन्वये मान्य केलेल्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्यासाठी पंचायतींनी करावयाच्या निधींच्या विनियोगासंबंधीचे प्रमाणपत्र ग्राम सभेकडून घेईल ;

(दोन) ती भूमि संपादन प्राधिकरण पंचायतीच्या अधिकारितेत येणारी अनुसूचित क्षेत्रातील कोणतीही जमीन विकास प्रकल्पांसाठी आणि अशा प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तीचे पुनर्वसन किंवा पुनर्वसाहत करण्यासाठी संपादन करण्यापूर्वी सल्ला घेईल; परंतु, प्रत्येक पंचायत आपला दृष्टिकोन संबंधित भूमि संपादन प्राधिकरणाला कळविण्यापूर्वी ग्राम सभेचा सल्ला घेईल;

(तीन) अनुज्ञप्ती प्राधिकरणाने,—

(अ) अशा अनुसूचित क्षेत्रांमधील गौण खनिजासाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खाणी भाडेपट्ट्याने देणे;

(ब) गौण खनिजांचे समुपयोजन करण्यासाठी लिलावाद्वारे सवलत ;

यासाठी अनुज्ञप्ती किंवा परवानगी देण्यापूर्वी शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

(चार) संबंधित गावामध्ये या संस्थांकडे व कार्यकारी संस्थांकडे सामाजिक क्षेत्र कार्यक्रमांचे कार्यान्वयन सोपवण्यात आले आहे त्यांच्या कामावर देखरेख करणे आणि प्रगतीचे संनियंत्रण करणे तसेच सामाजिक क्षेत्र कार्यक्रमाच्या कार्यान्वयनासंबंधात पंचायत समितीला व जिल्हा परिषदेला योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

१९६२ चा महा. ५. **स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, "सामाजिक क्षेत्र" म्हणजे, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ ची कलमे १००, १०२, १०३ किंवा १२३ च्या तरतुदींअन्वये जिल्हा परिषदेकडे आणि कलम १०१ अन्वये पंचायत समितीकडे, तसेच, या अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये पंचायतीकडे सोपवण्यात आलेली कोणतीही योजना, कार्यक्रम, प्रकल्प किंवा काम होय ;

(पाच) अनुसूचित जनजातींच्या व्यक्तींच्या जमिनीचे अन्यसंक्रामण करण्यासंबंधात त्या वेळेपुरता अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी विचारात घेता, अनुसूचित जनजातींच्या व्यक्तींच्या जमिनीचे बेकायदेशीररित्या अन्यसंक्रामण करण्यास प्रतिबंध करणे आणि कोणतीही बेकायदेशीररीत्या अन्यसंक्रामित जमीन त्यांना परत करणे याकरिता जिल्हाधिकाऱ्यांकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

१९४७ चा मुंबई ३१. (सहा) ज्या ज्या वेळी एखादी व्यक्ती संबंधित पंचायतीच्या क्षेत्रात सावकारीसाठी अनुज्ञप्ती मिळण्याकरिता, अर्ज करील त्यावेळी मुंबई सावकार अधिनियम, १९४६ च्या कलम ३ अन्वये नियुक्त केलेल्या निबंधकाकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

(सात) महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ अन्वये निहित करण्यात आलेल्या गौण वनोत्पादनाचे समुपयोजन, व्यवस्थापन व व्यापार यांचे विनियमन करण्यास सक्षम असेल.". १९९७ चा महा. ४५.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५७ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ५७, पोट-कलम (२) मधील, खंड (फ) नंतर पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(फअ) पंचायतीच्या अधिकारितेत असलेल्या आणि त्या पंचायतीकडे निहित असलेल्या अनुसूचित क्षेत्रात गोळा केलेल्या गौण वनोत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न किंवा स्वामित्वधन.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाचे कलम ५८, यास पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) पोट-कलम (क) मध्ये काहीही अंतर्भूत असेले तरी, पंचायत क्षेत्राचा भाग अंशत: अनुसूचित क्षेत्रामध्ये असेल आणि अंशत: बिगर अनुसूचित क्षेत्रामध्ये येत असेल तर, गौण वनोत्पादनाच्या विक्रीचे कलम ५७, पोट-कलम (२), खंड (फअ) अन्वये, ग्रामनिधीमध्ये जमा केलेले उत्पन्न किंवा स्वामित्वधन केवळ उक्त अनुसूचित क्षेत्रांच्या विकासासाठी खर्च करण्यात येईल.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ६० ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ६०, पोट-कलम (१) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल ,—

"परंतु, हा सचिव, संबंधित पंचायतीच्या ग्रामसभेचा सचिव म्हणूनही काम पाहील.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यात कलम १५३ ब समाविष्ट करणे.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम १५३ अ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल,—

अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामसभा किंवा पंचायत यांना सूचना वा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

"**१५३ ब.** पंचायतीसंबंधी उपबंध (अनुसूचित क्षेत्रांना लागू करणे) अधिनियम, १९९६, याच्या तरतुदींची अंमलबजावणी किंवा त्यांचे अनुपालन करण्याच्या संदर्भात, अनुसूचित क्षेत्रांतील जनजातींच्या हिताच्या दृष्टीने, यथास्थिति ग्रामसभा किंवा पंचायत यांनी अनुसरावयाच्या धोरण विषयक बाबीं-संबंधात, राज्य शासन, अनुसूचित क्षेत्रांतील कोणत्याही ग्रामसभेला किंवा पंचायतीला सर्वसाधारण किंवा विशेष सूचना देऊ शकेल. अशा सूचना किंवा निदेश देण्यात आल्यावर, त्या सूचना किंवा, यथास्थिती, निदेश अंमलात आणणे हे ग्रामसभेचे किंवा पंचायतीचे कर्तव्य असेल.". **१९९६ चा ४०.**

## प्रकरण तीन

### महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात सुधारणा

१९६२ चा महा. ५. ८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०० नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम १०० अ समाविष्ट करणे.

"१००अ. संबंधित जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटांमध्ये मोडणारे अनुसूचित क्षेत्र असणारी प्रत्येक जिल्हा परिषद,— अनुसूचित क्षेत्रांमधील जिल्हा परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

(एक) चा भूमिसंपादन प्राधिकरण अनुसूचित क्षेत्रामधील कोणतीही जमीन विकास प्रकल्पांसाठी आणि अशा प्रकल्पांमुळे बाधित व्यक्तींचे अशा अनुसूचित क्षेत्रांमध्ये पुनर्वसन किंवा पुनर्वसाहत करण्यासाठी संपादन करण्यापूर्वी, सल्ला घेईल.".

(दोन) प्रत्येक जिल्हापरिषद अनुज्ञप्ती प्राधिकरणाला,—

(अ) अशा अनुसूचित क्षेत्रांमधील गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खाणी भाडे-पट्ट्याने देणे ;

(ब) गौण खनिजांचे समुपयोजन करण्यासाठी लिलावाद्वारे सवलत देणे यांसाठी अनुज्ञप्ती किंवा परवानगी देण्यापूर्वी अशा प्राधिकरणाकडे शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

(तीन) अनसूचित जनजातीच्या व्यक्तीच्या जमिनीचे हस्तांतरण किंवा, अन्यसंक्रामण करण्यासंबंधात त्यावेळेपुरता अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी विचारात घेता, अनसूचित जनजातीच्या व्यक्तीच्या जमिनीचे बेकायदेशीररीत्या हस्तांतरण किंवा, अन्यसंक्रामण करण्यास प्रतिबंध करणे आणि कोणतीही बेकायदेशीररीत्या हस्तांतरीत किंवा अन्यसंक्रामित जमीन त्यांना परत करणे या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल;

१९४७ चा मुंबई ३१. (चार) ज्या ज्या वेळी एखादी व्यक्ती अशा अनुसूचित क्षेत्रांत सावकारीसाठी अनुज्ञप्ती मिळण्याकरिता अर्ज करील त्यावेळी मुंबई सावकार अधिनियम, १९४६ च्या कलम ३ अन्वये नियुक्त केलेल्या निबंधकाकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल :

परंतु, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय हा, संबंधित जिल्हा परिषदेवर बंधनकारक राहील.".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १०१ अ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यात कलम १०१ ब समाविष्ट करणे.

अनुसूचित क्षेत्रांतील पंचायत समितीचे सक्षम अधिकार व कर्तव्ये.

" १०१ब. संबंधित गटांमधील एकापेक्षा अधिक पंचायतीमध्ये अनुसूचित क्षेत्रे असणारी पंचायत समिती,——

(एक) चा भूमिसंपादन प्राधिकरणा अनुसूचित क्षेत्रामधील कोणतीही जमीन विकास प्रकल्पांसाठी आणि अशा प्रकल्पांमुळे बाधित असलेल्या व्यक्तींचे पुनर्वसन किंवा पुनर्वसाहत करण्यासाठी संपादन करण्यापूर्वी, अशा प्राधिकरणाचा सल्ला घेईल;

(दोन) त्या वेळेपुरता अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा विनियमांच्या तरतुदींच्या अधीन, अनुज्ञप्ती प्राधिकरणास——

(अ) अशा अनुसूचित क्षेत्रांमधील गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खाणी भाडेपट्ट्याने देणे ;

(ब) गौण खनिजांचे समुपयोजन करण्यासाठी लिलावाद्वारे सवलत ;

यासाठी अशा प्राधिकरणाने अनुज्ञप्ती किंवा परवानगी देण्यापूर्वी शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

(तीन) अशा अनुसूचित क्षेत्रात, सामाजिक कार्यक्रम राबविण्याचे काम सोपविलेल्या संस्था व कार्यकारी संस्था यांच्या प्रगतीचे संनियंत्रण करणे व कामकाजाचे पर्यवेक्षण करणे यासाठी सक्षम असेल.

**स्पष्टीकरण.**——या खंडाच्या प्रयोजनार्थ, " सामाजिक क्षेत्र " याचा अर्थ या अधिनियमाच्या कलम १००, १०२, १०३ किंवा १२३ च्या तरतुदी अन्वये जिल्हा परिषदेकडे अणि कलम १०१ अन्वये पंचायत समितीकडे, तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम ४५ अन्वये पंचायतीकडे सोपविलेली योजना, कार्यक्रम प्रकल्प किंवा काम, असा आहे. १९५९ चा मुंबई ३.

(चार) अनुसूचित जनजातींच्या व्यक्तींच्या जमिनीचे अन्यसंक्रामण किंवा हस्तांतरण करण्यासंबंधात, त्यावेळेपुरता अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतूदी विचारात घेता, अनुसूचित जनजातींच्या व्यक्तींच्या जमिनीचे बेकायदेशीररीत्या हस्तांतरण किंवा अन्यसंक्रामण करण्यास प्रतिबंध करणे आणि अनुसुचित जनजातींच्या सदस्यांच्या बेकायदेशीररीत्या हस्तांतरीत किंवा अन्यसंक्रामित केलेल्या कोणत्याही जमिनी त्यांना परत करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम राहील :

(पाच) ज्या ज्या वेळी एखादी व्यक्ती अशा अनुसूचित क्षेत्रात सावकारीसाठी अनुज्ञप्ती मिळण्याकरिता अर्ज करील त्यावेळी मुंबई सावकार अधिनियम, १९४६ याच्या कलम ३ अन्वये नियुक्त केलेल्या निबंधकाकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम राहील : सन १९४७ चा मुंबई ३१.

परंतु, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय हा, संबंधित पंचायत समितीवर बंधनकारक राहील :

## प्रकरण चार

### मुंबई सावकार अधिनियम, १९४६ याची सुधारणा

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ७ ची सुधारणा.

१०. मुंबई सावकार अधिनियम, १९४६ याच्या कलम ७ मधील पोट-कलम (१) मध्ये पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील,——

" परंतु निबंधक, संबंधित ग्रामसभेशी आणि संबंधित पंचायतीशी विचारविनिमय केल्यानंतर, आणि अनुज्ञप्तीची व्याप्ती एकापेक्षा अधिक ग्रामसभांमध्ये आणि पंचायतींमध्ये असेल त्याबातीत ज्यांच्या अधिकारितेच्या क्षेत्रात सावकार सावकारीचा धंदा करीत असेल किंवा सुरू करण्याच्या विचारात असेल अशा सर्व संबंधीत ग्रामसभांशी व पंचायत समितींशी विचारविनिमय केल्यानंतर अनुसूचित क्षेत्रामध्ये अशी अनुमती देईल :

परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी ह्या बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय संबंधित पंचायत समितीवर बंधनकारक राहील.".

स्पष्टीकरण.—या परंतुकांच्या प्रयोजनासाठी,—

१९५९ चा मुंबई ३. (एक) "ग्रामसभा", "पंचायत" व "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील;

१९६२ चा महा. ५. (दोन) "पंचायत समिती" या शब्दप्रयोगाचा अर्थ महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे असेल.".

## प्रकरण पाच

### महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याची सुधारणा

१९६२ चा महा. ३. ११. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ याच्या कलम ३२ मधील पोट-कलम (२) मध्ये पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३२ ची सुधारणा.

"परंतु, संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन, अनुसूचित क्षेत्रामध्ये येत असल्यास, राज्य शासन असे संपादन करण्यापूर्वी,—

(एक) ती जमीन एका पंचायतीच्या क्षेत्रात येत असेल तर, संबंधित ग्रामसभेशी आणि पंचायतीशी;

(दोन) ती जमीन संबंधित गटातील एकापेक्षा अधिक पंचायतींच्या क्षेत्रात येत असेल तर संबंधित ग्रामसभा व पंचायत समितीशी;

(तीन) ती जमीन संबंधित जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटांच्या क्षेत्रामध्ये येत असेल त्या बाबतीत संबंधित ग्रामसभांशी आणि जिल्हा परिषदांशी विचारविनिमय करील ;

असा विचारविनिमय, राज्य शासन, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवून देईल अशा रीतीने करण्यात येईल:

परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय संबंधित पंचायत समिती किंवा यथास्थिति, जिल्हा परिषद यांवर बंधनकारक राहील.

स्पष्टीकरण.—या परंतुकांच्या प्रयोजनाकरिता,—

१९५९ चा मुंबई ३. (एक) "ग्रामसभा", "पंचायत" व "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगांना, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील;

१९६२ चा महा. ५ (दोन) "पंचायत समिती" व "जिल्हा परिषदा" यांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.".

## प्रकरण सहा

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ याची सुधारणा

१९७७ चा महा. २८. १२. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ याच्या कलम ४१ मधील, पोट-कलम (१) याच्या विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील,— सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २८ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

"परंतु आणखी असे की, संपादन करण्याचे प्रस्तावित केलेली जमीन अनुसूचित क्षेत्रामध्ये येत असेल तर असे संपादन करण्यापूर्वी किंवा अशा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची पुनर्वसाहत किंवा पुनर्वसन करण्यापूर्वी राज्य शासन,—

(एक) ती जमीन, एकाच पंचायत क्षेत्रात येत असल्यास संबंधित ग्रामसभेशी आणि पंचायतीशी ;

(दोन) ती जमीन, संबंधित गटातील एकापेक्षा अधिक गावांच्या क्षेत्रात येत असल्यास संबंधित ग्रामसभांशी आणि पंचायत समित्यांशी;

(तीन) ती जमीन, संबंधित जिल्ह्याच्या एकापेक्षा अधिक गटांच्या अधिकारितेत येत असल्यास संबंधित ग्रामसभांशी आणि जिल्हा परिषदेशी;

असा विचारविनिमय करील. विचारविनिमय राज्य शासनाने या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून, त्याद्वारे ठरवून देईल, अशा रीतीने करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय हा संबंधित पंचायत समिती किंवा यथास्थिति, जिल्हा परिषद यांवर बंधनकारक राहील.

**स्पष्टीकरण.**—या परंतुकांच्या प्रयोजनाकरिता,—

(एक) "ग्रामसभा", "पंचायत" आणि "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगांना, मुंबई ग्राम-पंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील;

(दोन) "पंचायत समिती" व "जिल्हा परिषद" या शब्द प्रयोगांना, अनुक्रमे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.".

## प्रकरण सात

### मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ याची सुधारणा

१९४९ महाराष्ट्र अधिनियम ...ांक २५ ...त नवीन ...म ११अ ...माविष्ट करणे.

**१३.** मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ याच्या कलम ११ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल.—

दारूबंदी अंमलात ...णण्याचा किंवा ...णत्याही मादक ...ची विक्री ... वापर यांचे ...विनियमन ...रण्याचा ... त्यावर निर्बंध ...लण्याचा ...मसभेचा ...धिकार.

"**११अ.** ग्रामसभा आणि पंचायत, किंवा पंचायत समिती किंवा यथास्थिति, जिल्हा परिषद यांच्या अधिकारितेत येत असलेल्या कोणत्याही अनुसूचित क्षेत्रांच्या बाबतीत कलम ११ मध्ये किंवा या अधिनियमातील अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी ग्रामसभा आणि पंचायत किंवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद ही तिच्या अधिकारितेत येणाऱ्या अनुसूचित क्षेत्रात दारूबंदी अंमलात आणण्यास किंवा मादक द्रव्यांची विक्री आणि वापर यांचे विनियमन करण्यास किंवा त्यावर निर्बंध घालण्यास सक्षम असल:

परंतु, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय, हा संबंधित पंचायत समिती किंवा यथास्थिति, जिल्हा परिषद यांवर बंधनकारक राहील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता,—

(एक) "ग्रामसभा", "पंचायत" आणि "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगांना, मुंबई ग्राम-पंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील;

(दोन) "पंचायत समित्या" आणि "जिल्हा परिषदा" या शब्दप्रयोगांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.".

प्रकरण आठ

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ यात सुधारणा

१९७६ चा महा. ३७. १४. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ४४ च्या पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील,— सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

"परंतु, संपादन करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेली जमीन, अनुसूचीत क्षेत्रामध्ये येत असेल तर असे संपादन करण्यापूर्वी किंवा अशा अनुसूचीत क्षेत्रांमधील अशा प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींची पूनर्वसाहत किंवा पुनर्वसन करण्यापूर्वी, शासन,—

(एक) ती जमीन एका पंचायत क्षेत्रात येत असेल तर, संबंधित ग्रामसभेशी आणि पंचायतीशी ;

(दोन) ती जमीन संबंधित गटातील एकापेक्षा अधिक क्षेत्रात येत असेल तर संबंधित ग्रामसभांशी आणि पंचायत समितीशी ;

(तीन) ती जमीन संबंधित जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटांच्या क्षेत्रामध्ये येत असेल त्याबाबतीत, संबंधित ग्रामसभांशी आणि जिल्हा परिषदेशी ;

विचारविनिमय करील.

असा विचारविनिमय, राज्य शासन, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवून देईल अशा रीतीने करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय हा संबंधित पंचायत समिती किंवा यथास्थिति, जिल्हा परिषद यांवर बंधनकारक राहील.".

**स्पष्टीकरण.**—या परंतुकाच्या प्रयोजनाकरिता,—

१९५९ चा मुंबई ३. (एक) "ग्राम सभा", "पंचायत" व "अनुसूचित क्षेत्रे" या शब्दप्रयोगांना, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील ;

१९६२ चा महा. ५. (दोन) "पंचायत समिती" व "जिल्हा परिषदा" यांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.".

## प्रकरण नऊ

### संकीर्ण

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५. १९४७ चा महा. ३१. १९६२ चा महा. ३. १९७७ चा महा. २८. १९४९ चा मुंबई २५. १९७६ चा महा. ३८.

अडचणी दूर करणे.

१५. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१, मुंबई सावकार अधिनियम, १९४६, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६, मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ किंवा महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ अंमलात आणताना किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा त्या अधिनियमातील बाबीसंबंधात त्यांपैकी कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, परिस्थितीनुसार, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ करणे आवश्यक वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.